अनुसूचित जाती / जमाती (अत्याचारास प्रतिबंध) कायद्याच्या प्रसिध्दी व जनजागृतीसाठी परिक्षेत्र स्तरावर कार्यशाळा आयोजित करण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्र. बैठक २०१६/प्र.क्र.१४९/का.१७
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई ३२
दिनांक : २४ ऑगस्ट, २०१८

<u>वाचा</u>: १. विशेष पोलीस महानिरीक्षक, ना.ह.सं.व म.अ.प्र.वि.महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/४१/नाहसं/टे.नं.२/तिमाही बैठक/कार्यशाळा/२९२/२०१७, दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७.

शासन निर्णय :-

पोलीस विभागातील तपासी अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता अनुसूचित जाती/ जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा याची प्रभावी अंमलबजावणी होणेकरीता परिक्षेत्रिय स्तरावर कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. त्याअनुषंगाने परिक्षेत्रावर कार्यशाळा आयोजित करण्याकरीता प्रत्येक परिक्षेत्राकरीता रु.१.६०लक्ष याप्रमाणे आठ परिक्षेत्रासाठी एकूण रु.१२.८०लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव विशेष पोलिस महानिरिक्षक, विशेष पोलीस महानिरिक्षक, नागरी हक्क संरक्षण व महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग,मुंबई यांनी त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये सादर केला आहे. त्यास अनुसरुन परिक्षेत्र स्तरावर कार्यशाळा आयोजित करण्याकरीता आवश्यक असलेला निधी रु.१२.८०लाख(रु.बारा लाख ऐंशी हजार फक्त) उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी सदरचा निधी आहरित करुन विशेष पोलीस महानिरिक्षक, नागरी हक्क संरक्षण व महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेकडे वर्ग करावा.

३. याबाबीवर होणारा खर्च मागणी क्र. टी-५ , २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, राज्य योजनातर्गत योजना, (०१) (४६) जनजाती क्षेत्र उपयोजनेखाली नव्याने अमंलबजावणी करण्यात आलेल्या योजनांची विविध माध्यमांमार्फत माहिती व प्रसिध्दी (२२२५ ४११३) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरिता असलेल्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०८२४१५४५४६०३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Ramdas Deshmukh

Digitally signed by Gajanan Ramdas Deshmukh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9adf2fe1f77176611c6dae66e0049cd0f51f36579d7c577ba3ed2c944d27d926, cn=Gajanan Ramdas Deshmukh
Date: 2018.08.24 15:47:23 +05'30'

(गजानन रा.देशमुख)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री/ राज्य मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
२. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३. पोलीस महासंचालक ,महाराष्ट्र राज्य, पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-०१
४. विशेष पोलिस महानिरिक्षक, ना.ह.सं.व म.अ.प्र.वि. महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई
५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
६. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर
८. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर
९. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर /अमरावती/ नाशिक व ठाणे
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
११.सह सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२
१२.सर्व उपसचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२
१३.अवर सचिव(का-६), आदिवासी विकास विभाग, मंत्राजय, मुंबई-३२
१४.कक्ष अधिकारी, का-५, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
१५.निवड नस्ती (का.१७)